**ठळक बातम्या**

- लाडकी बहीण योजना यशस्वी झाल्याचं सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून आनंद व्यक्त
- कच्च्या तेलावर २० टक्के आणि सुर्यफुलाच्या तेलावर ३२ टक्के आयात शुल्क लागू करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय
- महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाला सर्व प्रकारची मदत दिली जाईल, केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजु यांची ग्वाही
- चौथ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन

**आणि**

- घाटकोपरमध्ये रमाबाई नगर इथल्या इमारतीला लागलेल्या आगीत १३ जण जखमी

**<><><><><>**

शासनानं सुरू केलेली लाडकी बहिण योजना यशस्वी झाल्याचा आनंद असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. धाराशिव जिल्ह्यात परांडा इथं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमात आज ते बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित

पवार आणि आपण एकसंघपणे महिलांच्या कल्याणासाठी काम करत असल्याचं ते म्हणाले. ज्या महिलांच्या खात्यात अद्याप योजनेचे पैसे जमा झाले नाहीत, त्यांच्या खात्यात ३० सप्टेंबर पूर्वी पैसे जमा करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. ही योजना थांबणार नसून दर महिन्याला महिलांच्या खात्यात दीड हजार रुपये जमा करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं कच्च्या तेलावर २० टक्के आणि सुर्यफुलाच्या तेलावर ३२ टक्के आयात शुल्क लागू केलं आहे. वित्त मंत्रालयानं जारी केलेल्या अधिसूचनेनुसार कच्चे पाम तेल, सोयाबीन आणि सुर्यफुलावरील आयात शुल्क २० टक्क्यांनी वाढवलं आहे. या तेलांवर या पुढे ३५ टक्के आयात शुल्क द्यावं लागणार आहे. या बरोबरच अन्नधान्य महागाई कमी करण्यासाठी केंद्र सरकारनं गेल्यावर्षी लागू केलेले बासमती तांदूळ आणि कांद्यावरील किमान निर्यात मूल्य रद्द करण्याचा निर्णयही घेतला आहे. या निर्णयाबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शहा यांचे आभार मानले आहेत.

याबाबत बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले…

**होल्ड - देवेंद्र फडणवीस**

**<><><><><>**

गव्हाच्या किंमती नियंत्रित करण्यासाठी केंद्र सरकारनं गव्हाचे व्यापारी, ठोक व्यवसायिक त्याचप्रमाणे मोठी किरकोळ विक्रीची साखळी असलेल्यांची गव्हाची साठवणूक मर्यादा कमी केली आहे. या आधी हे व्यापारी ३ हजार टन गव्हाची साठवणूक करु शकत असत, आता त्यांना केवळ दोन हजार टन गहू साठवता येणार आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक पुरवठा मंत्रालयानं हे निर्देश जारी केले आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाला सर्व प्रकारची मदत दिली जाईल, कोणत्याही गोष्टीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. ते आज मुंबईत पारसी समुदायाच्या एका कार्यक्रमात बोलत होते. अल्पसंख्याक व्यवहार राज्यमंत्री जॉर्ज कुरियन, राज्याचे अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार आणि इतर यावेळी उपस्थित होते. पारसी समाजाची घसरती लोकसंख्या हे या समुदायासमोरचं सर्वात मोठं आव्हान असून त्याचा सामना करण्यासाठी केंद्र सरकार ‘जियो पारसी’ योजना राबवत असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. पारसी समुदायाची लोकसंख्या ५० हजाराच्या खाली येऊ नये, यासाठी तातडीनं पावलं उचलण्याची गरज आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयकाबद्दल कुणाच्याही मनात कोणताही संभ्रम असण्याची गरज नाही. काही लोक या विधेयकाला विरोध करत असले, तरी बहुतेक मुस्लिम

बांधवांनी या विधेयकाला समर्थन दिलं आहे, असा दावा केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी केला आहे. मुंबईत पारसी समुदायाच्या कार्यक्रमानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. देशात सर्वांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, मात्र या विधेयकाबद्दल खोट्या गोष्टी पसरवून कुणीही नागरिकांची दिशाभूल करू नये, असं आवाहन त्यांनी केलं.

दरम्यान, रिजिजु यांनी आज  'भगवान बुद्ध यांच्या मध्यम मार्गाद्वारे भविष्यातील जागतिक नेतृत्वासाठी मार्गदर्शन' या विषयावरल्या कार्यक्रमाला संबोधित केलं. बुद्ध धर्माला योग्य रीतीनं पुढे नेण्याचा प्रयत्न केंद्र सरकारनं केला आहे, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आजपासून दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यादरम्यान, ते, दूरस्थ मध्यमातून, मुंबईतील एल्फिन्स्टन टेक्निकल कॉलेजमध्ये, राज्यभरातल्या ४३४ आयटीआय संस्थांमधील संविधान मंदिरांचं उद्घाटन करतील. तसंच, नागपूर इथल्या रामदेवबाबा विद्यापीठातल्या डिजिटल टॉवरचं उद्घाटनही उपराष्ट्रपतींच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यातर्फे घेण्यात येणारी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा येत्या १० नोव्हेंबर रोजी घेण्यात येणार आहे. इयत्ता पहली ते पाचवी आणि इयत्ता सहावी ते आठवीसाठी सर्व माध्यमातल्या अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित आदी शाळांमधील शिक्षण सेवक आणि

शिक्षक पदावरच्या नियुक्तीसाठी ही परीक्षा उत्तीर्ण होणं आवश्यक आहे. परीक्षेची सूचना आणि इतर माहिती  महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या https://mahatet.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

<><><><><>

गेल्या काही वर्षांत जम्मू- काश्मीर मध्ये युवकांच्या राजकारणातल्या सहभागामुळे विकासाचं नवं युग अवतरल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज जम्मू- काश्मीरमध्ये डोडा इथं प्रचारसभेला संबोधित केलं. स्वातंत्र्यानंतर जम्मू- काश्मीर हा प्रदेशावर जगाचं लक्ष असल्याचं ते म्हणाले. यापूर्वी ज्या पक्षांवर जम्मू- काश्मीरच्या नागरिकांनी विश्वास ठेवला, त्या पक्षांनी फक्त परिवारवादाला महत्व दिल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे जम्मू- काश्मीरमधला युवा वर्ग हा आतंकवादामुळे पिचला असल्याचं त्यांनी म्हटलं.

<><><><><>

देशाला एकसंध ठेवण्यात हिंदी भाषेची महत्त्वाची भूमिका असून या भाषेचं रक्षण आणि संवर्धन करणं ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं राजभाषा हीरक जयंती उत्सवनिमित्त आयोजित चौथ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं अमित शाह यांच्या हस्ते उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. हिंदी आणि इतर भारतीय भाषांमध्ये कोणतीही स्पर्धा नाही उलट या सर्व भाषा एकमेकांना पूरक आहे. त्यामुळे सर्व भाषांचं संवर्धन करूनच एका सक्षम राष्ट्राची निर्मिती होईल, असंही शहा म्हणाले. _गेल्या दहा वर्षांत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली हिंदी आणि इतर स्थानिक भाषांना समृद्ध करण्यासाठी भरीव कार्य केल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज सांगितलं.

<><><><><>

देशभरात आज राष्ट्रीय हिंदी दिवस साजरा केला जात आहे. १४ सप्टेंबर १९४९ रोजी संसदेनं हिंदीला राष्ट्रीय भाषेचा दर्जा दिला होता. तेव्हापासून आजचा दिवस हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. या निमित्तानं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशवासीयांना एका व्हिडीओ संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत. हिंदी भाषा ही भारताचा अभिमान आणि परंपरा असल्याचंही त्यांनी या संदेशात म्हटलं आहे. या भाषेला वगळून प्रगती शक्य नाही असंही ते म्हणाले. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही हिंदी भाषा दिनानिमित्त एक व्हिडीओ संदेश जारी केला असून त्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर हिंदी भाषा स्विकारली गेली पाहिजे असं म्हटलं आहे.

<><><><><>

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या प्रमुख नेत्यांची बैठक आज राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्‍डा यांच्या उपस्थितीत होत आहे. निवडणुकीसाठी नेत्यांना दिलेल्या जबाबदारीचा आढावा या बैठकीत घेण्यात येणार आहे.

<><><><><>

मुंबईतल्या घाटकोपरच्या रमाबाई नगर इथल्या शांती सागर इमारतीला मध्यरात्री दीड वाजता भीषण आग लागली. यात १३ जण जखमी झाले. इमारतीच्या विद्युत मीटर केबिनला आग लागल्यानं संपूर्ण इमारतीत धूर पसरला. आगीची माहिती मिळाल्यावर अग्निशमन दलानं घटनास्थळी धाव घेत इमारतीमधील ८० ते ९० जणांना सुरक्षितपणे बाहेर काढलं. आगीवर दीड तासात नियंत्रण मिळवलं. दरम्यान जखमींना राजावाडी रुग्णालयात दाखल केलं आहे.

<><><><>

जम्मू-काश्मीर मधल्या किश्तवाड़ जिल्ह्यात काल दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत दोन भारतीय जवान शहीद झाले. तर दोन जवान जखमी झाले. त्यांना तातडीनं जवळच्या रुग्णालयात नेलं.

<><><><>

जम्मू काश्मिरमधल्या बारामुल्ला जिल्ह्यात क्रीरी इथं सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी मारले गेले. पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार क्रीरी परिसरातल्या एका गावात लपलेले दहशतवादी आणि सुरक्षा दलामध्ये जोरदार चकमक झाली. त्यात दहशतवादी मारले गेले.

<><><><>

चीनमध्ये हुलुनबुईर इथं सुरु असलेल्या पुरुषांच्या आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं पाकिस्तानवर २-१ अशी मात केली.

<><><><>

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, स्वीडनमधल्या गणेशोत्सवाविषयी.

<><><><>

राज्य शासनाने १६ सप्टेंबरला घोषित केलेली ईद ए मिलादची सुटी १८

सप्टेंबरला देण्याचा निर्णय घेतला आहे. मुस्लीम बांधव ईद निमित्त जुलूस काढत असतात. १७ सप्टेंबरला गणेशविसर्जन असल्यामुळे यंदाचा जुलूस १८ सप्टेंबरला काढण्याचा निर्णय मुस्लीम बांधवांनी घेतला आहे. त्यासाठी राज्य शासनानं ही सुटी १८ सप्टेंबरला दिली आहे.

**//<><><><><>//**